# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **21/05/2023**

**Brief of the work done** :-

दुचाकी चोरांना पो.स्टे. कारंजा शहर पोलीसांनी ठोकल्या बेड्या ; चोरीतील दुचाकी जप्त

## दुचाकी चोरांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कारंजा** ▪ येथील काजी प्लॉटमधील रहीवासी मोहमद खालीद मोहमद असलम नगरीया यांनी एम एच ३७ एस ७०४० क्रमांकाची दुचाकी १४ मार्चला घरा समोर उभी केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची फिर्याद दाखल केल्याने पोलिसांनी अज्ञात आरोपी विरूध्द भादवीच्या कलम ३७९ नुसार गुन्हा दाखल करून अज्ञात दुचाकी चोराचा शोध सुरू केला होता. अशातच पुसद मधील वंसतनगर पो स्टे मधील एका गुन्हयात दुचाकी जप्त करण्यात आल्याची माहिती मिळाल्याने ठाणेदार सोनोने यांच्या मार्गदर्शनात पोलिस पथकाने पुसद येथे जावून आरोपीचा कसुन शोध घेउन पृथ्वीराज लक्ष्मण चव्हाण वय २३ वर्ष रा आदर्श नगर पुसद व ओंकार दिपक कोल्हे वय २३ वर्ष रा जमकेश्वर नगर पुसद या दोन आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. यावेळी चोरीची दुचाकी देखील जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधिक्षक बच्चनसिंह, उपविभागीय पोलिस अधिकारी जगदीश पांडे, ठाणेदार आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शनात पोलिस नाईक उमेशकुमार बिबेकर, खोलेश्वर खुपसे व नितीन पाटील यांनी केली. (ता.प्र.)